www.vinoba.in

# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग
मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : १३३-३४) वर्धा, सोम-मंगळवार ता. २४-२५ ऑ. ६४ (मूल्य १० पैसे

## पू. विनोबांचे स्वास्थ्य

पू. विनोबा यांची प्रकृति आता सुधारत आहे. त्यांच्या आहारात फळें व मध यांचा समावेश करण्यात आला आहे. दिनांक २३ रोजी रविवारी सिव्हिलसर्जन डॉ. गायतोंडे व डॉ. महोदय यांनी प्रकृति तपासली . वर्धेचे कलेक्टर श्री. डांगे हे हि त्यांचेबरोबर पू. विनोबांची प्रकृति पाहण्यास गेले होते. त्यांचे रक्त पुन: आता तपासण्यासाठी घेण्यांत आले आहे. त्यांना झोप चांगली लागते. दिवसभर ते पूर्ण विश्रांति घेत असतात. क्वचित ते 'विनय पत्रिका' वाचतात. अशक्तता बरीच आहे. घामहि बराच येतो. त्यामुळे थकवा येतो. श्रीमती महादेवीताई ह्या त्यांचे जवळ येऊन राहिल्या आहेत. आचार्य दादा धर्माधिकारी काहीं दिवस पवनारला येऊन राहून गेले.

विनोबांची प्रार्थना प्रवचनें —

## "अव्दितीय तूं"



आज आपण देवाचे एकच नांव घेऊ.—'अव्दितीय तूं ! अव्दितीय म्हणजे दुसरा कोणी देवाच्या बरोबरीचा नाही. देव म्हणजे देवच. एखादा महापुरुष झाला, बलवान राजा झाला, मोठा पहाड झाला तरी देवाची बरोबरी करू शकत नाही. ईश्वरासारखा ईश्वरच. आपण त्याचे भक्त होऊ शकतो. पण त्याची बरोबरी करू शकणार नाही. एकच ईश्वर सर्व सृष्टीला सांभाळणारा आहे. सृष्टीचा उत्पन्न-कर्ता आहे. सृष्टीला लीन करणारा आहे. तसा दुसरा कोणी नाही. ही ईश्वराविषयीची कल्पना आहे. तेव्हा दुसरे नाव घ्यायला उरत नाही.

ईश्वराच्या बरोबरीचा कोणी नाही हे तर झालेच–हे तर कोणीहि मान्य करील. त्याची सेवा आपण करावी. त्याची बरोबरी करू शकणार नाही. ईश्वराचे नांव घेतल्यावर मोजायला वस्तूच शिल्लक रहात नाही. समजा आपण इथली मुले मोजू लागलो–रामा, कृष्णा, गोविंदा, हरी चार नावे झाली, आणखीहि होतील. पण आज ईश्वराचे नाव घ्यायला लागलो तर, एक ईश्वर, दोन डोंगर, तीन झाड, चार नदी असे मोजता येणार नाही. एक ईश्वर मोजले की, आणखी उरणार नाही. ईश्वराच्या पोटात सर्व आले. आपण असे म्हणू शकत नाही की, एक हिंदुस्थान, एक पवनार, एक नागपुर. कारण पवनार, नागपुर हे हिंदुस्थानाच्या पोटात आहे. हे झाड, डोंगर, नदी, मनुष्य सर्व ईश्वराच्या पोटात आहेत. म्हणून ईश्वराचे एक नांव घेतले की, दुसरे कांही उरत नाही. ईश्वराला बाजूला ठेवा आणि मोजदाद करा–एक, दहा, शंभर, हजार, दहाहजार, लाख, दहा लाख–कोटी दहा कोटी, अब्ज, खर्व, निखर्व.– पण ईश्वराचे नाव घेतले की, एक ईश्वर आणि दुसरा मोजायला शिल्लकच रहात नाही. हेच ज्ञानदेवानी सांगितले आहें.— 'एक नांव हरी । द्वैत नांव उरी ।'

एक हरीचे नांव घेतल्यावर दुसरे नांव रहात नाही. ह्या अर्थाने अद्वितीय व एक ईश्वर म्हटल्यावर दुसरे मोजायला शिल्लक रहात नाही म्हणजे अकाल. समजा डाळिंब आहे. त्यात दाणे असतात. डाळिंबातील दाणे मोजता येतात. पण डाळिंब मोजल्यावर आता एक डाळिंब, दोन दाणे, तीन साल असे मोजता येईल का ? नाही. कारण डाळिंबाच्या पोटात सर्व आले. म्हणून ईश्वराचे नांव घेतल्यावर कांही शिल्लक रहात नाही. हा अद्वितीयचा अर्थ आहे.

पुष्कळ लोक म्हणतात देवाला नवस करू आणि म्हसोबाला करू, खंडोबाला करू, अशी पन्नास नावे घेतात. हे बरोबर नाही. ईश्वराच्या बरोबर ही नावे आणता येत नाहीत. म्हणून अद्वितीय नांव आहे. उपनिषदात हे आले आहे–'एकमेवाद्वितीम्' एक तोच एकमेव अद्वितीय आहे. बैल असतो. त्याला दोन शिंगे असतात. गेंड्याला एकच शिंग असते. तसा भगवान अगदी अद्वितीय आहे. असे ईश्वराचे फार मोठे लक्षण आहे–'एकमेवाद्वितीयम्'.

ब्रह्मविद्यामंदिर–१७-७-१९६४

--०--

# ग्रामदानी कार्यकर्त्यांची कार्यसंहिता

आचार्य विनोबानी ग्रामदानी कार्यकर्त्यांच्या साठी जी कार्यसंहिता सांगितली आहे तिचे कांही विवरण मागील अंकात केले. आता त्याच संहितेच्या आणखी कांही भागाचे येथे निवेदन करावयाचे आहे.

ग्रामदानी कार्यकर्त्यांच्या बटव्यात गांवाला उपयोगी पडणाऱ्या अनेक चीजा असाव्या यावर विनोबांचा कटाक्ष आहे. पण या चीजा गांवाच्या समग्र जीवनाशी सुसंगत असाव्या. त्यांचे द्वारा ग्रामीण लोकांचा नैतिक व आध्यात्मिक स्तर वर उचलला जावयास पाहिजे. विनोबांनी हे स्पष्ट केलेले आहे की, लोकांना जर केवळ भौतिक गरजाच पूर्ण करून घ्यावयाच्या असतील तर त्यासाठी सरकार आहे. सरकारकडे मागणी करून व आवश्यक झाले तर सरकारवर दबाव आणून लोकांनी आपल्या गरजा पूर्ण करून घ्याव्या. त्यासाठी विनोबांचे 'आरोहण' नाही. ग्रामदानी कार्यकर्ता जो सर्वोदयाचा विचार मांडेल तो मुख्यत: लोकांच्या नैतिक व आध्यात्मिक गरजा पूर्ण करणारा असावा, असा विनोबांचा आग्रह आहे.

ह्या गरजा पूर्ण करण्याचे माध्यम म्हणून, विनोबा म्हणतात, चार गोष्टींचा आश्रय ग्रामदानी कार्यकर्त्यांनी घेतला पाहिजे. (१) शेती, (२) चरखा, (३) गीताई पठण व (४) 'जय जय रामकृष्ण हरीचे' भजन. यांच्या द्वारा प्रारंभीच लोकांची मनें त्यांच्या नित्याच्या प्रापंचिक कटकटीतून थोडी उंच उठू शकतील. शरीर व मन यांचे भक्तीकडे तादात्म्य होऊ लागेल. आणि इतर विचार ऐकण्याच्या मन:स्थितीत ते येऊ लागतील. श्री. संत गाडगे महाराज भजनाच्या साह्याने अवखळ अशा लहान मुलांच्या गलबल्याला सुद्धा शिस्तीचे, संयमाचे व भक्तीचे वळण लावीत असत.

त्यानंतर कार्यकर्त्यांनी लोकांच्या घरोघर गेले पाहिजे व त्यांच्याशीं जिव्हाळ्याचा संपर्क स्थापन केला पाहिजे. ह्या संपर्क स्थापन करण्याच्या दृष्टीने विनोबा म्हणतात, खालील बाबतींतली विचारपूस उपयोगी पडू शकेल-- (१) एखाद्या घरीं विचारावे, आपल्या घरी जातें आहे का व तिचा आम्हाला उपयोग करू द्याल का ? (२) शौचकूपांचे खड्डे तयार करून देण्यासाठी आपणास मदत केली तर चालेल का, असे दुसऱ्या एखाद्या ठिकाणी विचारावे व आवश्यक असेल तर खड्डा खोदून देण्यास मदत करावी. (३) या गांवात नग्न स्नान करणारे लोक आहेत का, याची एखाद्या घरी चौकशी करावी. सुरगांवला तर विनोबानी या बाबतीत एक आंदोलनच चालविले होते. (४) कोणाला विचारावे. तुम्हाला योगासने शिकवितो, शिकाल का ? जे तयार होतील त्यांना ती शिकवावीत. (५) कोणाच्या बगीच्यात जावे व आपणास कांही सूचना करण्यासारख्या असतील तर कराव्यात. बाहेरचे पाहुणे आपला बगीचा पहायला येतात यांत बगीचामालकाला मोठा आत्मगौरव वाटत असतो. आपण केलेल्या प्रयोगांचे तो मोठे रसभरीत वर्णन करीत असतो त्याच्या ह्या आनंदात आपण सहभागी झालो तर त्याला तुमच्याबद्दल विशेष आपुलकी वाटू लागते. (६) दुसऱ्या एखाद्या ठिकाणी चौकशी करावी की, गांवात कांही पोथी, पुराण, वर्तमानपत्र, पुस्तक यांचे नियमित वाचन चालत असते का ? कोणकोण वाचतात ? काय वाचतात ? किती लोक श्रवणास जमतात ?

विनोबा म्हणतात, याप्रमाणे लोकसंपर्काच्या अनेक तऱ्हा आहेत व त्यांचा अवलंब ग्रामदानी कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. ज्या ठिकाणी असे दिसेल की, ही सर्व कामे चालतात दुसऱ्या तेथून, गांवात जाऊन ती कामे सुरु करावीत.

गांवकऱ्यांशी संपर्क करतांना अनेक प्रकारे विचारपूस करता येईल. उदाहरणार्थ, या गांवातून लग्न झाल्यामुळे किती मुली बाहेरगांवी गेल्या आहेत व

( पृष्ठ ४ कॉलम ४ वर )

www.vinoba.in



# दारिद्र्यनाशाच्या आघाडीवर अगोदर यश मिळवू या

## पाकिस्तान व चीन यांच्याबाबत केलेल्या सूचनाविषयी जयप्रकाशजींचा खुलासा

सध्याच्या परिस्थितीत आपल्याला देशांतील दारिद्र्य व भूक आणि पाकिस्तान व चीन अशा तीन आघाड्यावर एकाच वेळी लक्ष देणे शक्य होणार नाही, असे श्री. जयप्रकाशनारायण यांनी एका निवेदनात म्हटले आहे.



चीन व पाकिस्तान यांच्याशी तड-जोड करण्याविषयी आपण केलेल्या सूचनावरून उत्पन्न झालेल्या गैरसमजांचे निराकरण करण्यासाठी श्री. जयप्रकाश यांनी आज हे निवेदन प्रसिद्ध केले आहे. श्री. जयप्रकाशजींनी यात म्हटले आहे की अमेरिकेची मदत घेतली नाही तर या तिन्ही आघाड्यावर लढतांना तिन्हीत अपयश पदरी घेणे आपल्यास भाग पडेल आणि अमेरिकन मदत घेणे हे माझ्या मते पूर्णपणे अनिष्ट आहे. त्याचप्रमाणे उपासमार परकरू, पण आम्ही आमच्या शत्रुशी लढा देत राहू अशा घोषणा करणेहि सोपे आहे. ज्यांना पोटभर खायला प्यायला मिळते, असलेच लोक या प्रकारच्या घोषणा करीत असतात.

### प्रथम काय करावयाचे आहे ते ठरवा

श्री. जयप्रकाशजी आपल्या निवेदनात म्हणतात, 'माझ्या अलिकडील काही सूचनावर सरकारची जी प्रतिक्रिया व्यक्त झाली आहे तिच्याविरुद्ध मला काहीहि तक्रार करावयाची नाही. पण इतर लोकांच्या प्रतिक्रिया पाहाता त्यांच्या मनात खोल गैरसमज निर्माण झाले आहेत असे वाटते व ते शक्य तितके दूर करण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

माझे म्हणणे असे आहे की आपल्या देशातल्या लोकांनी आपल्यास प्रथम कोणती गोष्ट करावयाची आहे हे ठरविले पाहिजे. माझ्या मते पहिली गोष्ट आपण करायला पाहिजे ती म्हणजे भुकेलेल्यांना अन्न देणे, वस्त्राशिवाय राहावे लागते त्यांना वस्त्र पुरविणे, काम करण्याच्या स्थितीत असलेल्या माणसांना काम देणे आणि प्रत्येक भारतीय कुटुंबास किमान सुखी जीवन मिळेल अशी हमी देणे हे आहे. ही गोष्ट केली नाही तर वाढता असंतोष नि वाढत्या हालअपेष्टा याच्यात बंडासारखी व अराजकतेची परिस्थिति निर्माण करण्याच्या हेतूने जाणूनबुजून चाललेल्या प्रयत्नांची भर पडून देशाचे भवितव्य अतिशय धोक्यात येईल. या अंतर्गत आघाडीवरील लढाईसाठी सध्याच्या परिस्थितीत आपल्यास शक्य असलेल्यापेक्षा किती तरी अधिक शक्ति व साधन लावायला पाहिजे आहे. या आघाडीवर सर्व शक्ति व सर्वसाधन बळ एकवटणे शक्य व्हावे याकरिताच दुसऱ्या दोन आघाड्यावर तडजोड करावी असे मी सुचवीत आहे. आपल्या शत्रूस शरण जा असा काही माझ्या सूचनेचा अर्थ नाही, माझे म्हणणे आहे की आपण ज्यांच्याशी देवाणघेवाणीच्या पद्धतीने राजकीय तडजोड करावी."

### भारत पाक सहकार्याची शक्यता

याप्रमाणे प्रस्तावना केल्यावर श्री. जयप्रकाश नारायण यांनी भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंधाबाबत असे प्रतिपादन केले आहे की उभय-देशांतील वादाविषयी व मतभेदाविषयी सारखे तुणतुणे वाजवीत न बसता दोघांच्याही हिताच्या अशा काही गोष्टी आहेत काय यांचा शोध करून त्या गोष्टीबाबत एकमेकांशी सहकार्य करण्यात दोन्ही देशांनी तयार व्हावे. ज्यात सहकार्य करता येईल अशा अनेक बाबी आहेत असेही श्री. जयप्रकाश यांना वाटत आहे व त्यांचे मत आहे की अनेक बाबतीत सहकार्याचे नाते वाढेल तर परस्परांतील गैरविश्वास दूर होईल आणि मग कश्मीरचा प्रश्नही वाटतो तितका कठिण राहणार नाही. उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण इत्यादि क्षेत्रांत उभय देशांच्या हिताच्या गोष्टी सापडू शकतील.

### चीनविषयी

चीनच्या प्रश्नाकडे वळून श्री. जयप्रकाश नारायण यांनी म्हटले आहे की चीनबरोबरचा सीमा-तंटा लढाईने सोडविला जाऊ शकणार नाही. भारत व चीन यांच्यात वरचेवर लढाया होत राहणे या गोष्टीचा विचारसुद्धा भयंकर वाटतो. दुसरे असे की, कायद्याच्या भूमिकेवरूनही हा प्रश्न सोडविता येणार नाही. या प्रश्नावरील पुरावा ध्यानात घेऊन वाद सोडविला जावा ही सूचना मान्य करायला चीन सतत नकार देत आला आहे. याचसाठी देवाण-घेवाणीच्या तत्त्वावर राजकीय तडजोड चीनशी करावी असे आपल्यास वाटते.

देवाणघेवाण म्हणजे शरणागति नव्हे कारण दोन्ही पक्षांना देवाणघेवाण करावी लागते असे सांगून अक्साई चीनबाबत चीनचा खास हितसंबंध आहे याचा उल्लेख करून श्री. जयप्रकाश यांनी सुचविले की, सदहू भाग चीनला भाड्याच्या पद्धतीवर वापरायला द्यावा.

श्री. जयप्रकाशजी पुढे म्हणतात. एका खाजगी व्यक्तीच्या शब्दाने राष्ट्र काही बांधले जाणार नाही. ही सूचना मुद्दाम करण्यात माझा हेतु असा आहे की, या प्रश्नावरील विचार जो एकाच चाकोरीस घट्ट पकडून आहे तो मोकळा व्हावा. लंकेचे श्री. फेलिक्स बंदरनायके यांच्या शब्दात काही तथ्य असेल तर या प्रश्नावर नव्याने व ताजा विचार करण्याची गरज खरी व निकडीची आहे हे उघड होईल.

---०---

## ग्रामदानी कार्यकर्त्यांची कार्यसंहिता

( पृष्ठ १ वरून )

त्या कोणकोणत्या गांवी आहेत ही चौकशी ग्रामीण लोकांच्या मनोवृत्तीचा ठाव घेण्याच्या दृष्टीने फार महत्वाची असते. जेथे त्या मुली असतील तेथे गेल्यावर त्यांच्या माहेरच्या गांवाहून आपण आलो व मुद्दाम मुलीची खुशाली कळावी म्हणून तुमच्या घरी आलो हे समजल्याने त्या मुलीला व तिच्या सासरच्या लोकांना अगत्य वाटू लागते व माहेरच्या लोकाना विशेष आनंद होत असतो. बाहेरच्या किती मुली लग्न झाल्यामुळे या गांवात आल्या आहेत याचीहि माहिती, अशीच उपकारक ठरण्यासारखी असते. गांवात शंभरी गाठलेले म्हातारे कोण कोण आहेत याची माहिती मिळवून व त्यांना भेटून त्यांचेबद्दल आपला आदर प्रकट करणे हे सुद्धा उपयुक्त ठरते. त्यांच्याशी बोलणें करावे व ते लिहून ठेवावे. अशां संभाषणांतून पुष्कळ नवीन इतिहास प्रकाशांत येऊ शकतो.

अशा रीतीने ग्रामस्थांशी संपर्क करीत असतानाच कार्यकर्त्याच्या हे ध्यानात येऊ लागेल की, कोण कोण लोक व किती प्रमाणात आपल्या ग्रामदानाच्या विचाराला अनुकूल होण्यासारखे आहेत. हे समजून घेतल्यावरच पुढील फेरीच्या वेळी ग्रामदानाचा विचार तेथील लोकासमोर मांडावा. जेथील लोक जात प्रमाणात अनुकूल आहेत असे आपणास वाटत असेल तेथे ग्रामदानाचा जोरदार पुरस्कार ग्रामदान घडवून आणावे; आणि जेथे अनुकूलता कमी आहे असे वाटत असेल तेथे पुनः वरील उपायानी सहानुभूति जिंकण्याचा प्रयत्न चालू ठेवावा.

समर्थांनीहि म्हटले आहे की,

कर्म केलें चि करावें । ध्यान धरिले चि धरावें ।
विवरिलेचि विवरावे । पुन्हा निरूपणा ॥

हा समर्थांचा उपदेश प्रचाराच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

ह. बा. देशपांडे

---०---

## अहमदाबाद

अहमदाबाद जिल्ह्यात भीम-तलाव नावाचे एक नवीन गाव ग्रामदान झाले.

संपादक :-श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:-श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:-गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
महाराष्ट्र-सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग दैनिक ता. २४ २५-८-६४ अ.१३१-३२ र.नं.एन.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य )
श्री.